चित्तशुद्ध्यर्थ जीं कर्में । दोन्ही मार्गीं समान तीं ॥
त्यापुढे योगियां ध्यान । सांख्या शुद्ध विवेकचि ॥ ८२ ॥
साधकाच्याहि दृष्टीने । सांख्य योगैक्य होतसे ॥
अंतःसंन्यास योग्यांचा । सांख्याचा तो स्वरूपतः ॥ ८३ ॥
दोघेहि असती सिद्ध । साधने प्राप्त झालिया ॥
तयांच्या तुलनेलागीं । जगीं जीव नसेचि कीं ॥ ८४ ॥
संयमें वा विवेकाने । निजशक्त्यनुसार जे ॥
सिद्ध होती तयामध्यें । तत्वता भिन्नता नसे ॥ ८५ ॥
ऐशियाचि अभिप्राये । सांख्ययोगैक्य पूर्ण जे ॥
ते कदा नुमजे बाळा । ऐसें कृष्ण स्वयें वदे ॥ ८६ ॥
**पांडवांनीं** तसा **कृष्णें** । **त्यागियेला प्रपंच** हा ॥
प्रारब्धाच्या क्षया अंतीं । भारतीं इतिहास हा ॥ ८७ ॥
**जनकानेंहि संन्यास** । **केला** ऐशी असे कथा ॥
पहावी भारतीं तीहि । निःसंशयचि व्हावया ॥ ८८ ॥
विनाप्रारब्ध जे कर्म । सर्वस्वीं त्याज्य ते असे ॥
**सर्वारंभ परित्यागी । ज्ञानी सद्भक्त होत ते ॥ ८९ ॥**
स्तवराजाचिया अंतीं । **भीष्मांचा भक्तियोग** जो ॥
**रघुवंशींहि तो होता** । क्षत्रिया मुक्तिदायक ॥ ९० ॥
“ **योग तूझा घडावा** ” ही । **समर्थांचीच उक्ति जी** ॥
**भक्तीच श्रेष्ठ** मानूनी । प्रार्थिते परमेश्वरा ॥ ९१ ॥
विवेकें आणि वैराग्ये । गीतामाता पुजोनियां ॥
ब्रह्मनिष्ठा जयां लाभे । संन्यासी तेचि ईश कीं ॥ ९२ ॥
सांईकृपाचि हे बोल । नीलकंठ मुखे वदे ॥
होवोत ते असद्दाहा । उलूकां सविता जसा ॥ ९३ ॥

**इति उत्तरार्धः समाप्तः । श्री सांईनाथार्पणमस्तु ॥**

**॥ शुभंभवतु ॥**

## —तरणोपाय—

### —ॐ नमस्ते ज्ञानमयश्रीधराय—

सरस्वतीसवे लक्ष्मी तीहि गेली। जंबुद्वीपा आली अवदशा ॥ १ ॥
स्वर्णभूमि ऐसें नाम जया होतें। हीनताच त्याते बहु आली ॥ २ ॥
वासनाफलत्वें विद्या सान्शा गेल्या। कलाहि निमाल्या समूळचि ॥ ३ ॥
दुःसंगाच्या योगे स्वत्व हारपले। पारतंत्र्य आले सहज ते ॥ ४ ॥
भौतिक नाशाचा नाहीं आम्हा खेद। मरकेचि विशद भौतिक हे ॥ ५ ॥
आत्मज्ञाननाशें वाटे हळहळ। मनीं तळमळ होते फार ॥ ६ ॥
वेद देव धर्म यज्ञादिक कर्मे। हींच होतीं वर्मे उन्नतीचीं ॥ ७ ॥
ज्यांच्या बळावर जिंकिली मेदिनी। प्राचीन आर्यांनीं तीं हीं वर्मे ॥ ८ ॥
वेदाचा लक्ष्यार्थ कोणासी कळेना। वाच्यार्थेचि नाना बरळती ॥ ९ ॥
ऐशिया अज्ञाने अनार्यत्व आले। आर्यत्व ते गेले देशोधडीं ॥ १० ॥
ज्ञानाज्ञानांतील भेद तो कळेना। ज्ञान आकळेना अज्ञानाने ॥ ११ ॥
उच्छिष्ट भक्षण आलेसे कपाळा। तेणे अवकळा वाढतसे ॥ १२ ॥
सूक्ष्मत्वे वेदार्थ पाहण्याची बुद्धि। झाल्या चित्तशुद्धि होईल ती ॥ १३ ॥
वेदीं वेद्य हरि त्याचे गुणज्ञान। झालिया अज्ञान हारपेल ॥ १४ ॥
अज्ञानाच्या सवें जातसे आपदा। सात्विक संपदा लाभे पुढे ॥ १५ ॥
श्रद्धा ठेवूनिया शोधिल्या वेदार्थ। अखिलचि स्वार्थ साधेल तो ॥ १६ ॥
अज्ञाने असिद्ध ठरविती ज्ञान। नाहीं त्या समान मौर्ख्य अन्य ॥ १७ ॥
पराव्याचा कावा नोळखूनि मूढ। वेदज्ञान गूढ ते त्यजिती ॥ १८ ॥
मिथ्याभावे पाहे त्यास दिसे मिथ्या। वेदातील सत्या तो दुरावे ॥ १९ ॥
श्रद्धा व्हावी आधीं पुढे ज्ञान लाभे। अश्रद्धेच्या क्षोभें ज्ञानहानि ॥ २० ॥
अतींद्रिय हरि बुद्धिग्राह्य आहे। तद्योगें त्या पाहे जो त्या मिळे ॥ २१ ॥
परमप्रेमातें म्हणतात भक्ति। आत्यंतिकासक्ति हरिठायीं ॥ २२ ॥
ऐशिया प्रेमाने वश ज्याला देव। तया देती खेव योगसिद्धि ॥ २३ ॥
योगसिद्धिद्वारें होतो दीनोद्धार। संपदा अपार देताति त्या ॥ २४ ॥

कर्मी अधिष्ठान लागतें हरीचें । ऐसे समर्थांचे वाक्य आहे ॥ २५ ॥
साग यज्ञरूप असे एक हरि । नेणती हे वैरी श्रीहरीचे ॥ २६ ॥
यज्ञरूपी हरि तदर्थ साधक । इतर बाधक होती कर्मे ॥ २७ ॥
ऐसे सांगे गीता तिचा मथितार्थ । वदले समर्थ स्ववाणीने ॥ २८ ॥
योगैश्वर्य लाभा आद्य व्हावी भक्ति । भक्तीने विरक्ति ये सहज ॥ २९ ॥

**एते सत्पुरुषाः परार्थघटकाः स्वार्थान्परित्यज्यये ॥**
**सामान्यास्तु परार्थमुद्यमभृता स्वार्थाविरोधेन ये ॥**
**ते मे मानुष राक्षसाः परहितं स्वार्थाय निघ्नंतिये ॥**
**ये निघ्नंति निरर्थकं परहितं ते के न जानीमहे** ॥ भर्तृहरि ॥

क्षुद्र परार्थाचा अधिकारी नोहे । स्वकुटुंबी आहे ज्या आसक्ति ॥ ३० ॥
ऐशिया लोकांनीं परार्थाच्या बाता । मारितां तत्त्वता तोचि दंभ ॥ ३१ ॥
स्वार्थ साधनांत परार्थहि होये । त्यामाजीं न जाये पापबाधा ॥ ३२ ॥
परि ऐशा कर्मे नोहे पुण्यलाभ । पातकाचा क्षोभ नावरी तें ॥ ३३ ॥
स्वार्थ साधनार्थ परार्थाची हानि । करी पापखाणी, तो राक्षस ॥ ३४ ॥
"यज्ञ" ह्या शब्दाचा अश्रुतपूर्वार्थ । दावूनि अनर्थ जे करिती ॥ ३५ ॥
आणि ऐशा कर्मा "ज्ञानयज्ञ" नाम । ठेवूनिया भ्रम वाढविती ॥ ३६ ॥
लोकीं ऐशा यज्ञे द्रव्यैषणातृप्ति । अमित साधिती जे याज्ञिक ॥ ३७ ॥
त्याच्या नामोच्चारे विटाळेल जिव्हा । न ते कर्म आम्हां इष्ट आहे ॥ ३८ ॥
ऐशिया राक्षसीं भारिलेसे जग । म्हणूनि उबग त्याचा वाटे ॥ ३९ ॥
परि प्रेरी साई ज्या ज्या कर्मामाजीं । त्यांत आम्हां राजी होणें आहे ॥४०॥
सच्छ्री आणि ज्ञान ह्याचाचि विचार । करूं शास्त्राधार देखूनियां ॥ ४१ ॥
नव्हे तो श्रीमत स्वये जो न धाला । समाधान ज्याला नाहीं पूर्ण ॥४२॥
कोणी वाञ्छी पुत्र कोणा द्रव्यैषणा । कोणा लोकैषणा सदोदित ॥ ४३ ॥
दारेच्छा लागली कित्येकांच्या मागे । स्वहितीं न जागे कोणी एक ॥४४॥
शरीरसामर्थ्य वाञ्छीतसे कोणी । नाहीं समाधानी कोणी जगीं ॥ ४५ ॥
सत्ता इच्छी कोणी सारेच भिकारी । दिसे नानापरी एक दैन्य ॥ ४६ ॥

एकमेकावरी चढाओढ चाले । ऐशियानें आले काय हाता ॥ ४७ ॥

**सुखस्य दुःखस्य न कोपि दाता । परो ददातीति कुबुद्धिरेषा ॥**
**अहं करोमीति वृथाभिमानः । स्वकर्मसूत्रग्रथितोहि लोकः ॥**

सुखदुःखदाता असे प्रभु एक । कोणासीच देख न ही दृष्टि ॥ ४८ ॥
**प्रारब्धयोगाने** सुखदुःख मिळे । एक दैव खेळे सर्व देहीं ॥ ४९ ॥

**॥ प्रारब्ध कर्मणां भोगादेव क्षयः ॥**

**प्रारब्धाचा** क्षय भोगाविना काहीं । कदा होत नाहीं हा सिद्धांत ॥ ५० ॥
दुःखनिवृत्यर्थ सारेचि झटती । तरी तीं आयती येतीच कीं ॥ ५१ ॥
**तैशीच** सुखेंही सारींच आयती । येती तेथें गति न प्रयत्ना ॥ ५२ ॥

**अवश्यम्भावि भावनां प्रतीकारो भवेद्यदि ।**
**तदा दुःखैर्न लिप्येरन् नल रामं युधिष्ठिराः ॥**

प्रारब्धासी नाहीं कांहींच उपाय । **क्रियमाण** सोय लावी पुढें ॥ ५३ ॥
प्राप्त देह राहे बद्ध **प्रारब्धाने** । न **क्रियमाणाने** ते बदले ॥ ५४ ॥
**संचितीं** बदल अथवा तन्नाश । करी सावकाश **क्रियमाण** ॥ ५५ ॥

**तपसा ब्रह्म विजिज्ञासस्व ॥ इति श्रुतिः ॥**
**ऐकाग्र्यं परमं तपः ॥ इति स्मृतिः ॥**

श्रीमान् तोचि एक जो **सत्कर्में** करी । राहोनी अंतरीं समाधानीं ॥ ५६ ॥
**सत्** असे **ब्रह्म** तत्प्राप्त्यर्थ कर्मे । तेवढीं सत्कर्मे नान्य कांहीं ॥ ५७ ॥
**ब्रह्म आत्मा ईश एकात्मक** होती । निष्ठाद्वयें प्राप्ति होय त्याची ॥ ५८ ॥
**सत्कर्म स्वधर्म** ह्यात भेद कांहीं । तत्त्वता तो नाहीं किंचिदपि ॥ ५९ ॥
**स्व** शब्दाचा अर्थ कळेनाचि कोणा । व्यापक तो जाणा आत्मरूपे ॥ ६० ॥
**स्व** म्हणजे **आत्मा सत्** म्हणजे **ब्रह्म** । नाहीं द्वैतभ्रम दोन्ही ठायीं ॥ ६१ ॥
भ्रमाने **मुख्यात्मा** भासतो त्रिविध । **गौण मिथ्या** भेद भ्रमे होती ॥ ६२ ॥
**भिन्नात्मा** तो गौण **देहात्मा** तो **मिथ्या** । कोणी नेणें तथ्या या प्रकारें ॥ ६३ ॥
मुख्यात्मा निर्धर्म देहात्माहि तैसा । जडभावे कैसा न होईल ? ॥ ६४ ॥
एवं धर्मकर्मे गौणात्म्याते येती । जेथे करी वस्ती द्वैतभाव ॥ ६५ ॥

# वर्गणीदारांकरितां

१. श्रीसाईलीलेचा वर्षारंभ चैत्र महिन्याचे अंकापासून आहे. नवीन वर्गणीदारास वर्षारंभापासून अंक घ्यावे लागतील.

२. श्रीसाईलीला प्रसिद्ध झाल्याबरोबर वर्गणीदारांकडे रवाना होते. अपरिहार्य अडचणीमुळें विलंब न झाल्यास चालू वर्षांत प्रत्येक महिन्यास एक जोड अंक निघेल.

३. पत्ता बदलणे झाल्यास लगेच आम्हांस कळवावे. बदललेला पत्ता न कळविल्यामुळे कित्येक वेळां अंक गहाळ होतात.

४. अंकासंबंधीं पत्रव्यवहार आमचेकडे करावा.

५. लेखासंबंधीं पत्रव्यवहार संपादकांकडे करावा.

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला**

# लेखकांकरितां.

१. श्रीसाईलीलेत प्रसिद्धीसाठीं पाठविलेला लेख अथवा कविता कागदाच्या एका बाजूवर,मार्जिन सोडून,सुवाच्य बालबोध लिपींत असावा.पेन्सिलीने किंवा कागदाचे दोन्हीं बाजूस लिहिलेला मजकूर छापण्यास फार त्रास पडतो.

२. लिखाणासोबत पूर्ण नांव व पत्ता दिला पाहिजे. नांव प्रसिद्ध न करितां टोपण नांवाखालीं प्रसिद्धि व्हावयाची असल्यास त्याप्रमाणें कळवावे.

३. लेख अथवा कविता हातीं आल्यानंतर १ महिन्यांत पसंति अगर नापसंति कळविली जाईल. पसंति कळविल्यानंतर, आम्हांला कळविल्याशिवाय लेखकांनीं तो मजकूर दुसरीकडे छापविण्यास देऊं नये.

४. लेखांत योग्य तो फेरफार करण्याचा अधिकार आमचेकडे राहील. येईल तसा शब्दशः प्रसिद्ध करण्याची हमी आम्हीं घेत नाहीं.

५. लेखासोबत पुरेसें पोस्टेज आल्यास, नापसंत लेख परत करूं.

संपादक—**श्रीसाईलीला**

## खालील पुस्तकें आमचेकडे मिळतील.

श्रीसाईनाथ सगुणोपासना किं. ०≈. ह. भ. प. दासगणूकृत-संतलीलामृत किं. १॥ रु. भक्तलीलामृत १॥ रु. व भक्तिसारामृत किं. ३॥ ट. ख. शिवाय.

गो. र. दाभोळकर ५ सेंट मार्टिन्स रोड, बांद्रे मुंबई न. २०

श्री साईनाथ भजनमाला, श्रीमति सावित्रीबाई तेंडुलकर, रंगाऱ्याची चाळ बांद्रे येथे मिळेल.

सर्व प्रकारचे मेंदूचे विकारांवर जाग्रण व मानसिक श्रम करणाऱ्यांस अत्यंत उपयोगी

नकलेबद्दल ] ब्राह्मी तेल [ सावध रहावें

बाळबाळंतिणीकरितां औषधें

बाळंत काढा नं. १ पहिल्या दहा दिवसाचा ०१४, बाळंत काढा नं. २ दहा दिवसानंतर ०१४, बाळकडू-मूल जन्मल्यापासून देण्यास योग्य ०८, कुमारी आसव लहान मुलाकरिता ०१२.

सतत २५ वर्षें लोकादरास पात्र झालेलें, कोणत्याही ऋतूंत घेण्यास योग्य, अत्यंत मधुर व आरोग्यदायक

एक रत्तल १०१० } द्राक्षासव { अर्धी रत्तल ०१४
दीड रत्तल २०८ } { ट. ख. पॅ. नि.

शिवाय आमचे कारखान्यात ठिकऊ तयार काढे, आसवे, अरिष्टे, भस्में वगैरे ५०० वर औषधे तयार आहेत त्याचे माहितीचा मोठा क्याटलाग व प्रकृतिमान भरून पाठविण्याकरितां "रुग्ण-पत्रिका" ही सात आण्याची तिकिटे आली असतां पाठवूं

दत्तात्रय कृष्ण सांडू ब्रदर्स

आर्यौषधी कारखाना, चेंबूर जि. ठाणे.

टे. नं. ८७०२४ x २२२७८. दुकान दवाखाना ठाकुरद्वार मुंबई नं. २


हें पुस्तक श्रीलक्ष्मीनारायण छापखाना, ३६४ ठाकुरद्वार, मुंबई येथें अनंत आत्माराम मोरमकर यांनी छापून अ. तर्खड यांनीं ५ सेंटमार्टिन्स रोड, बांद्रें येथें प्रसिद्ध केलें.

श्री [illegible]

[illegible] पुस्तक

वर्ष ५ वें ] [ अंक ९-१०

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम् ।

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| स्फुट साईभावदीप—श्री. नी. रा. सहस्रबुद्धे | ... ... | ७५३–७६४ |
| „ भावार्थ रामायणांतील वेंचे ... | ... ... | ७६५–७७० |
| „ ( गुरु-प्रसादोद्गार—( श्री. रामय्या ) | ... ... | ६१–७२ |
| महाराजांचे अनुभव ... ... | ... ... | ६२५–६२६ |
| „ „ ( प्रकाशकांकडून ) | ... ... | ६२७–६३१ |
| परमार्थप्रपा—( श्रीहेमाड ) ( प्रकाशकांमार्फत ) ... | ... | १—११ |
| श्रीसाईसच्चरित—( हेमाडपंत ) ... | ... ... | ८२१–८३६ |


## श्री साईभक्तांस विज्ञप्ति

कोणाला श्रीसाईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्रीसाई-लीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचे असतील त्यांनीं ते आमचेकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.

रा. आ. तर्खडकर

—प्रकाशक

## वार्षिक वर्गणी.

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनिऑर्डरीनें अगाऊ रु. ३।=, व्ही. पी. नें रु. ३।।, फुटकळ अंक ।=. मागील अंकास शिल्लक असल्यास -।।-

## चुकीची दुरुस्ती.

श्री साईलीला जोड अंक ६–७–८ व चालू अंक ९–१० यांतील साईभावप्रदीप या विषयाचीं पृष्ठें अनुक्रमें ६९९ ते ७२२ व ७५३ ते ७६४ छापलीं गेलीं आहेत. तरी तीं ६९४ ते ७०१ व ७०२–७१३ अशीं समजावीं.

असे म्हटले आहे परमेश्वर हा सर्वव्यापी आहे, ह्यास्तव तो सर्वद्रष्टा आणि सर्वसमर्थ आहे, अशी बुद्धीची पक्की खात्री झाली म्हणजे मग कोणत्याहि हेतूच्या सिद्धयर्थ फक्त त्याच्याचकडे धाव घेण्याची बुद्धि होते. हेच बुद्धीचे ऐकातिकत्व होय. तसेंच आधीं आपण दुसऱ्यावर प्रेम केल्याशिवाय दुसरा आपल्यावर प्रेम करीत नाहीं, असा मात्रिक अनुभव असल्यामुळें मनुष्य जेव्हा प्रथमतः ईश्वरावर परमप्रेम ( द्वितीयसूत्रान्वयें शुद्ध भक्ति ) करू लागतो, तेव्हा त्याची ऐकातिक निष्ठा पाहून ईश्वरासहि तो सहजच परमप्रिय झाल्यामुळे ईश्वर त्याची कामना पुरवून अंतीं त्याला मुक्त करितो; आणि तीच ऐकातिक भक्ति जर विषयदोषदर्शनादि साधनोद्भूत वैराग्यमूलक ( निष्काम ) असली तर ईश्वरप्रसादाने आत्मज्ञानलाभ होऊन जीव सत्वर मुक्त होतो.

वास्तविक पाहता ईश्वरप्रसादद्वारा आत्मज्ञान होऊन मुक्ति मिळावी ह्या हेतूनें जी ईशभक्ति होते, ती सुद्धां एक प्रकारची कामनिक भक्तीच होय; पण ती दोषमूलक अथवा दोषजनक नसल्यामुळे तिला वेदान्तशास्त्रात सकाम भक्ति म्हटलें नाहीं; कारण तिच्यामुळे कोणत्याहि अप्राप्त वस्तूची प्राप्ति होत नसून केवळ निजस्वरूपाज्ञाचा त्याग मात्र होत असतो. हे भक्तिरहस्य जाणूनच श्री मुकुंदराजानीं " **ईश्वरेवीण कामना पाहे। कालत्रयीं दुःखचि आहे ॥** " ह्या उक्तीने आत्मज्ञानप्राप्तीची इच्छा ही **काम** शब्दाच्या अपवादात घातली आहे. व्यवहारात जशी आपल्या मालकीच्या वस्तूचे स्वरूप समजण्याची अथवा तिचा तपास लावण्याची इच्छा योग्य समजली जात असून इतराच्या मालकीच्या वस्तूचा लाभ करून घेण्याची इच्छा दोषार्ह समजतात, तद्वत्च परमार्थात देखील आत्मेतर वस्तूच्या प्राप्तीच्या दुष्ट इच्छेला **काम** ही संज्ञा देऊन मग त्या कामाला त्याज्य ठरविला आहे; आणि हे तत्त्व मनात आणूनच "**धर्माविरुध्दोभूतेषु कामोस्मि भरतर्षभ**" ( भ. गी. ७-११ ) ह्या उक्तीने धर्मानुकूल असलेल्या इच्छेची, म्हणजे प्रत्यक्ष अथवा परंपरेनें मोक्षदायक असलेल्या इच्छेची भगवद्विभूति-

रूपात गणना केली आहे. शिवाय आत्मज्ञानप्राप्तीच्या इच्छेने केलेल्या भगवद्भक्तीने ती इच्छा सफल होऊन नंतर सहजच नष्ट होते, ह्या कारणास्तवहि तिचा अयोग्य कालीं त्याग केल्यास ते नुसते अकर्मच नव्हे, परंतु विकर्महि होईल ह्यासाठीं तिचा बुद्धिपुरःसर त्याग करणे प्रशस्त नाहीं. आणखी एक विचार असा आहे कीं, धर्मशास्त्रोक्त सत्कर्माचरण (भ. गी १६-२४) हे "**कार्य कर्म**" (भ. गी. ३-१९) असून ते चित्तशुद्धीस **कारण** होते; आणि ही चित्तशुद्धि मोक्षेच्छेचे **कारण** असून मोक्षेच्छा ही तिचे **कार्य** आहे, व मोक्षेच्छेची सिद्धि (सफलता) होण्याचे भक्ति हे फक्त साधन आहे. ह्याप्रमाणे मोक्षेच्छा हे प्रारब्ध कर्माचे फल असल्यामुळे तिच्या साधनाचा त्याग करणे अशक्य आहे (भ. गी. १८-५९). तात्पर्य, श्रुतिस्मृतिपुराणोक्त फलप्राप्त्यर्थ वैदिक सत्कर्माचरणाचा दृढ निश्चय झाला, म्हणजे "**निश्चयाचें बळ ॥ तुका म्हणे तेंचि फळ ॥**" ह्या नियमाप्रमाणे पुढील जीवनमुक्तीपर्यंत असलेली फलपरंपरा अवश्य उत्पन्न होणारच; आणि जीवनमुक्तीची भक्ति, ही केवळ आत्मरति असल्याकारणाने ती सहजच निष्काम असणार. वैदिक सत्कर्माचरणफलभूत जी सिद्धावस्था ती प्राप्त होऊन कर्मातीत झालेल्या **सर्वकर्मसंन्यासी** पुरुषाच्या निष्काम भक्तीचाच प्रस्तुत सूत्रात उल्लेख केलेला आहे.

प्रत्येक मोक्षेच्छु पुरुषाला सत्कर्माचरणद्वारां संसिद्धावस्था प्राप्त झाली म्हणजे त्याचा निष्कामतामूलक सर्वकर्मसंन्यास सहजच होतो, असा अबाधित नियम असल्यामुळे कर्माचरणद्वारा संसिद्धि प्राप्त झालेल्या **मिथिलाधिपति राजा जनकानेंहि** (भ गी. ३-२०) **शेवटीं** आपल्या पुत्राची राज्यावर स्थापना करून **सर्वकर्मसंन्यास केला,** अशा अर्थाचा भारतातील शांतिपर्वाच्या अध्याय ३१८ मध्ये सत्याण्णवावा श्लोक आहे, तो असाः—

> **विदेह राज्ये च तथा प्रतिष्ठाप्य सुतं स वै ।**
> **यतिधर्ममुपासंश्चाप्यवसन्मिथिलाधिपः ॥"**

**सूत्र ८.** ॥ निरोधस्तु लोकवेदव्यापारन्यासः ॥

**आर्या:—** लौकिक वैदिक कर्मैं, त्यागिलिया होतसे निरोध खरा ॥
**सांई** प्रेमरसीं जो, दंग तया काय भान कर्मांचें ॥

**विवरण**:—संसिद्धावस्थोद्भूत सर्वकर्मसंन्यासपूर्वक होणारी जी शुद्ध ऐकांतिक अद्वैत भक्ति, ती **इंद्रियनिरोधरूप** असते ( भ. गी. ३–४१ ) असे मागील सूत्रात म्हटले असून, ह्या सूत्रात **निरोध** म्हणजे निस्त्रैगुण्यरूप सर्व वैदिक आणि लौकिक कर्मांचा संन्यास होय ( भ. गी. २–४५ ) असे सांगितले आहे. इष्ट सिद्धिप्राप्त्यर्थ अवश्य असलेला शास्त्रोक्त कर्मसंन्यास **साधकांना** बुद्धिपूर्वक करावयाचा असतो ( भ. गी. २–४५;३–३७ ते४१, ६–२५,१६--२१ ); परतु तो सिद्धावस्थेचे साधनसमाप्तिरूप सहज ( स्वभावज ) फल असल्यामुळे **सिद्ध** पुरुषाना तो सहजत्वेंच प्राप्त होतो. सिद्धपुरुष द्वेषबुद्धीने सकल कर्मांचा सन्यास करितात, असा अर्थ नाहीं; कारण ते नित्य सन्यासी असल्यामुळे प्रारब्धप्राप्त अपरिहार्य कर्मांचा द्वेष करीत नाहींत, आणि अप्राप्त कर्मांची निर्वासनत्वास्तव इच्छाहि करीत नाहींत (भ. गी. ५-३ ). "**प्रारब्ध कर्मणां भोगादेव क्षयः**" ह्या सिद्धान्तान्वयें अवश्यत्वे घडून फलभोग दिल्यानेंच क्षयास जाणारे **संचितांश** रूप **प्रारब्ध,** आणि अहंकर्तृत्व बुद्धीने घडणारे **क्रियामाण,** हीं दोन्हींहि दोषमूलक आहेत, असा "**सर्वारंभा हि दोषेण धूमेनाग्निरिवावृताः**" (भ. गी. १८-४८ ) ह्या भगवदुक्तीचा अर्थ आहे. हे कर्मरहस्य जाणूनच सिद्धपुरुष शास्त्रोक्त साधनद्वारा "**सर्वारंभ परित्यागी,**" "**गुणातीत**" ( भ. गी. २-४५ व १४-२५ आणि शुद्ध भगवद्भक्त ( भ. गी. १२--१६ ) झालेले असतात. काया, वाचा आणि मन ह्यांच्या द्वारे जे जे कांहीं न्याय्य अथवा विपरीत कर्म घडून येत असते ( भ. गी. १८-१५ ) त्याला अधिष्ठानं ( काया ), कर्ता ( अहंकर्तृत्व भाव ), पृथग्विधं करणं ( भिन्न इंद्रिय समूह ) विविधा भिन्न चेष्टा ( भिन्न इंद्रियव्यापार ), आणि दैव ( अदृष्ट प्रारब्ध बल ) हीं सारीं मिळून कारणीभूत होतात ( भ. गी.

१८--१३ व १४ ). ह्यास्तव कर्मसंन्यास ( कर्मांविषयीं अहंकर्तृत्व भावन्यास ) ज्यानीं केला त्याना त्या कर्माचे जे अनिष्ट, इष्ट अथवा मिश्र (इष्टानिष्ट) फल असेल त्याचा मुळींच स्पर्शहि होत नसून तो फक्त **अत्यागी** (अहंकर्तृत्व भावनेने कर्माचरण करणारे) जे असतील त्यांना मात्र होतो (भ. गी. १८-१२).अर्थात् (१) स्वतःसाठीं किंवा आत्मेतरासाठी, (२)माझे वैषयिक कार्य, (३) मला केलें पाहिजे, आणि (४) ते मी करीन ह्या सकल भावना अहंकर्तृत्वमूलक असल्याने, त्या नुसत्या मनात येऊन त्याचा विचार ( संग ) करणेहि शेवटीं प्राणनाशासच कारण होते ( भ. गी २—६२ व ६३) असा भगवद्गीतेचा ठाम सिद्धात आहे; ह्यास्तव सिद्ध जे आहेत, ते मिथ्या जडप्रकृतिनिर्मित, जड, वैषयिक कार्याचा ( भ. गी. ३-२७ ) अथवा त्याच्या जड कारणाचा चिदात्म्याशीं काहींएक संबंध नाहीं, असे उमजून आणि तीं सकल कार्यकारणे आत्मभिन्न असलेल्या जड प्रकृति निर्मित देहाच्या प्रारब्धावर सोपवून स्वतः आपण त्याच्यासंबंधीं उदासीन म्हणजे रागद्वेषरहित असतात, म्हणूनच ते ईश्वरप्रसादास पात्र होऊन अंतीं निरंकुश तृप्तिरूप शांतिसुखाचा ( मोक्षाचा ) लाभ करून घेतात ( भ. गी. २--६४ ते ६६; ११--५५; १८--१६ व १७ ) अशा असंग वृत्तीलाच प्रस्तुत सूत्रात " **लोकवेदव्यापारन्यास** " म्हटले आहे.

ह्या कर्मसन्यासाचे महत्व आणि आवश्यकता दर्शविण्यासाठीं मागच्या सूत्राच्या विवरणाच्या शेवटीं राजा जनकाच्या संन्यासाची हकीकत दिली आहेच. आतां स्वतः भगवान् श्रीकृष्णानीं सर्व कर्मसंन्यास करून आपल्या ज्ञातीचा सहार चाललेला आपल्या डोळयानीं पाहिला, त्याबद्दल वसुदेवाने अर्जुनापाशीं दुःखोद्गार काढलेले महाभारतातर्गत मौसलपर्व, अध्याय ६, श्लोक १४ ह्यात दिले आहेत, ते असे आहेत:—

**गोविंदमनघं देवमभिजानीध्वमच्युतम् ।**
**प्रत्यपश्यच्च स विभुर्ज्ञातिक्षयमधोक्षजः" ॥**

( अर्थ—शार्दूलविक्रीडित )

**स्वज्ञातिक्षय पाहणें प्रभुवरें कृष्णें कसें साहिलें ॥**
**तणें ह्या मम मानसासी झुरतां कैसे सुखे पाहिलें ॥**
**सामर्थ्यास जयाचिया मित नसे तेणें अशी क्रूरता ॥**
**दावावी मजला न ह्या परिस हो कांहींच निष्ठूरता ॥**

अवतार पूर्वसंकल्परूपी प्रारब्धकर्माच्या सिध्यर्थच भगवान् श्रीकृष्णांनीं अखेरीस सर्वकर्मसन्यास करून भूभार हरण केला; आणि तेणेकरून नित्यसंन्यासी असलेले पुरुष कसाहि बिकट प्रसंग आला तरीं अहंममतेला वश होऊन आपल्या अंतःसंन्यास वृत्तीचा त्याग करीत नाहींत असे दर्शविले.। हा श्रीकृष्णाच्या **लोकसंहारक लोकसंग्रहाचा प्रकार किती भयकर आहे !**

महात्म्या पाडवानींहि प्रारब्धक्षयानंतर भगवान् श्रीव्यासाच्या आज्ञेनें तरुण राजा परिक्षिताची राज्यावर स्थापना करून आणि वैश्यापुत्र युयुत्सु ह्याच्या स्वाधीन सकल राज्यकारभार करून द्रौपदीसह सर्वकर्म संन्यास केल्याची सविस्तर हकीकत महाभारतांतील महाप्रस्थानिक नामक उपांत्य पर्वांत आहे. त्या पर्वांतील प्रथमाध्यायाचे श्लोक ६व७ ह्यावरून त्याचा बोध होईल. ते श्लोक असे आहेतः—

**ततो युयुत्सुमानाय्य प्रव्रजन् धर्मकाम्यया ।**
**राज्यं परिददौ सर्वं वैश्यापुत्रे युधिष्ठिरः ॥ ६ ॥**
**अभ्यषिंच स्वराज्ये च राजानं च परिक्षितम् । ७ ॥**

**अर्थः**—व्यासाज्ञा झाल्यावर महाराजा युधिष्ठिराने धर्मकामनेनें (श्रेष्ठ संन्यासधर्मपरिपालनार्थ ) सर्वसंगपरित्यागपूर्वक महाप्रस्थान करण्याचा विचार ठरवून वैश्यपुत्र युयुत्सुला बालावून आणून त्याचे हवालीं सर्व राज्यकारभार केला, आणि परिक्षितास राज्यभिषेक करविला.-- अनुगीतेतील संन्यास

धर्माचे श्रेष्ठत्व उमजून अनुगीतोपदेनुसार वर्तन करण्याचे भगवान् श्रीकृष्णास वचन देणाऱ्या सत्यभाषणी अर्जुनाचे शब्द खोटे कसे ठरणार ? " **वार्धक्ये मुनिवृत्तीनाम्**" हे जसे रघुवंशाचे ब्रीद होते, तसेच ते भरतवंशाचेही होते. " मुनि " शब्दाची व्याख्या अशी आहे:—

**" दुःखेष्वनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः ।।**
**वीतरागभयक्रोधः स्थितधीर्मुनिरुच्यते"** ( भ. गी २-५६ )

( अर्थ-श्लोक. नारायणभावदीपिका )

दुःखामधे मन कधींहि उदास नाहीं ।
नेणे सुखातिल फुशारकिची स्पृहाही ।।
कीं काम-कोप- भयवर्जित जो गणावा ।
नारायणस्थितमती मुनि तो म्हणावा ।।

असा अधिकार प्राप्त होण्याला चित्तैकाग्र्यपूर्वक ब्रह्मनिष्ठेचा दीर्घकाल अभ्यास लागतो हें चित्तैकाग्र्यच श्रेष्ठ तप आहे, असे **ऐकाग्र्यं परमं तपः**" ह्या स्मृतीनें सांगितले आहे; आणि चित्तैकाग्र्यास सर्वकर्मसंन्यास अवश्य आहे, ह्याच कारणास्तव अनुगीता, अध्याय ४७, श्लोक ५ ह्यात "**ज्ञानं वै परमं विद्यात्संन्यासं तप उत्तमम्**" असे भगवान श्रीकृष्णानीं म्हटले आहे. चित्ताला यत्किंचित जरी कर्माचा वेध लागला तरी त्या योगें त्याच्या ऐकाग्र्याला ग्रहण लागणारच; आणि ऐकाग्र्याला ग्रहण लागलें, म्हणजे ज्ञानाचा खग्रासहि होणारच. ह्यामुळे संन्यासाशिवाय आत्मलाभ होणें शक्य नाहीं; आणि आत्मज्ञानी पुरुष अहंकर्तृत्वाभावास्तव सर्वथा अकर्ता असल्यामुळे ज्ञानकर्मसमुच्चय केवल वंध्यापुत्रवत् अथवा मृगजलवत् मिथ्या होय. " **अहंभाव ज्या मानसींचा सरेना । तया ज्ञान तें अन्न पोटीं जिरेना ।।** " ह्या श्रीसमर्थांच्या शुद्ध प्राकृत उक्तीचाहि यथार्थ समजेनासा झाल्यामुळे " **कलौ वेदां-**

**तिनो भांति ॥ फाल्गुने बालका इव ॥** " ह्या उक्तिचाच नित्य सर्वत्र अनुभव येत आहे ! असो. सिद्ध पुरुष सर्वकर्मसंन्यासी असतो, इतकाच प्रस्तुत सूत्राचा अर्थ आहे.

कर्माचे **नित्य, नैमित्तिक, काम्य,** आणि **निषिद्ध** असे जे चार प्रकार वैदिक धर्मांत सांगितले आहेत त्यांतील **निषिद्ध** कर्म केवल पापमूलक त्वास्तव त्याज्य आहेत. निरीश्वरवादी मीमांसकांनीं त्रैगुण्यविषय वेदाधारें ( भ. गी. २--४५ ) ऐहिक आणि पारलौकिक-विषयसुख-लाभार्थ इंद्रादि देवता-प्रीत्यर्थ ज्या कर्मांना विहितत्त्व सांगितले आहे, तीं सारीं **काम्य** कर्में अनित्य फलदायित्वास्तव त्याज्य आहेत. आणि " ॐ **तत्सत्ब्रह्मार्पणमस्तु** "असे म्हणून जीं **नित्य** आणि **नैमित्तिक** कर्में केवल परमेश्वराप्रीत्यर्थ करावयाचीं असतात, तीं " **श्रुतिस्मृतिपुराणोक्त फलप्राप्त्यर्थ** "म्हणजे **चित्तशुध्यर्थ** मात्र विहित आहेत; तीं चित्तशुद्धीनंतर म्हणजे बुद्धि व्यवसायात्मिका झाल्या-नंतर अनवश्यकत्वास्तव उपादेय नाहींत.

**सूत्र ९. ॥ तस्मिन्ननन्यता तद्विरोधिषूदासीनता च ॥**

**आर्या साई**-प्रेमाब्धींतचि, अखंड राहोनि सौख्य तो भोगी ।
बाधक-भाव जरी ये, तरि तो ताटस्थ्य आदरी तेथें ॥

**विवरण:**—मागील सूत्रांत सिद्धपुरुषांचा **इंद्रियनिरोध** झाला असल्या मुळे त्याची भक्ति सकाम नसते, असें सांगून त्याच्या पुढील आठव्या सूत्रांत " **इंद्रियनिरोध** " ह्याची " **सर्वकर्मसंन्यास** " अशी व्याख्या केली. आतां ह्या सूत्रांत " **सर्वकर्मसंन्यास** " म्हणजे काय ते सांगितले आहे. अर्थात् भक्तांचा कर्मसंन्यास म्हटला म्हणजे एकांतिक ( अनन्य ) भक्तीस अनुकूल असलेल्या कर्मांचा अंगिकार करून तशा भक्तीस विरोधी असलेल्या कर्मांसंबधीं तटस्थावस्था ठवणे, असाच असावयाचा " **संन्यास** " शब्दाच्या ह्या स्पष्टीकरणांतील " **उदासीनता** " ( ताटस्थ्य ) हा शब्द फार महत्त्वाचा असून गूढार्थसूचकहि आहे. आपल्यास प्रतिकूल असलेल्या

कर्मांचा जसा अंगिकार करावयाचा नाहीं, तसाच त्याचा द्वेषहि करावयाचा नाहीं असे " **उदासीनता** " ह्या शब्दाने सुचविले आहे. कारण " **द्वेष** " ही भावना ( वासना ) अशुभ असून " **उदासीनता** " ( उपेक्षा ) ही शुभ वासना आहे. शुभ वासना एकंदर चार असून ( १ ) मुदिता, ( २ ) मैत्री, ( ३ ) करुणा, आणि ( ४ ) उपेक्षा अशीं त्याचीं नावे आहेत श्रेष्ठ अधिकारी पुरुष भेटला तर मुदितातःकरणाने त्याला शरण जाऊन, यथाशक्ति सेवाद्वारे त्याचा प्रसाद संपादन करावा; समान अधिकारी भेटल्यास मुदितातःकरणाने त्याच्याशीं ( मैत्री भ. गी. १०-९ ) करून एक-मेकाच्या साह्याने उभयतानीं आनंदांत असावे; व आपल्यापेक्षा कनिष्ठ अधिकारी भेटल्यास त्याला मुदितातःकरणाने यथाशक्ति मदत करावी, असे समानशील पुरुषांचे तीन प्रकार झाले. आणि अभक्त भेटला तर " **सर्प विंचू नारायण। परी वंदावे दूरून ॥**" ह्या उपदेशाप्रमाणे त्याच्याविषयीं उपेक्षाबुद्धि ठेवावी. परंतु कोणाचाहि द्वेष करूं नये. ( भ. गी. ५-३ ). " **संतुष्टः सततं योगी** " ( भ गी. १२-१४ ) ह्या उक्तींत " **मुदिता,** " आणि "**अद्वेष्टा सर्व भूतानां मैत्रः करुणाएवच**" ( भ. गी. १२--१३) ह्या उक्तींत उपेक्षा ( अद्वेस ) मैत्री, व करूणा ह्या तीन वासाना, अशा एकंदर चारी शुभ वासनाचा भक्तलक्षणात भगवान् श्रीकृष्णांनीं समावेश केला आहे.

**सूत्र १०.** ॥ अन्याश्रयाणां त्यागोऽनन्यता ॥

**आर्याः—** साईरूपी ईश्वर तदितर आश्रय दुजा न हितकारी ।
अन्याश्रय सोडियल्या भक्ता लाभे अनन्यता साची ॥

**विवरणः—**मागील नवव्या सूत्रांतील "**अनन्यता**" ह्या शब्दाचे ह्या सूत्रात स्पष्टीकरण केलें आहे. परमेश्वराशिवाय इतर कोणत्याहि देवतेस शरण न जाणे, ह्याचेच नाव " **अनन्यता** " असें म्हटलें आहे. भगवान श्रीकृष्णानीं

" अव्यक्तोक्षर इत्युक्तः तमाहुः परमां गतिम् ।
यं प्राप्य न निवर्तंते तद्धाम परमं मम ॥ "

( भ. गी. ८--२१ )

( अर्थ-आर्या-मोरोपंत )

जो अक्षर अव्यक्त श्रेष्ठ गती त्यास बोलती तज्ञ ।
ज्यातें पावोनि पुन्हां न फिरति मुनि परम धाम तें माझें ॥

ह्या उक्तीने सगुणेश्वराचें तात्विक स्वरूप जे निर्गुण ब्रह्म तेच सर्वश्रेष्ठ पद होय, असें सांगितले आहे. आणि नंतर निर्गुण ब्रह्मोपासक व सगुणेशोपासक ह्यांमध्यें श्रेष्ठ **योगवत्तं** कोण, असा अर्जुनाने प्रश्न केल्यावरून (भ गी. १२-१)

भगवंतानीं असा बोध केलाआहे कीं:—

( १ ) परमश्रद्धेने आपुले मन मत्स्वरूपीं अखंड ठेवून जे माझे सतत चिंतन करितात त्याना मी उत्तम योगयुक्त समजतों. ( भ. गी. १२-२. )

( २ ) सकलेंद्रियाचा निरोध करून " जीवो ब्रह्मैव ना परः" अशीं बुद्धीने सर्व जीवावर सारखेच प्रेम करणारे जे पुरुष अक्षर, अतींद्रिय, अव्यक्त, सर्वव्यापी, कल्पनातीत, अचल, व नित्य अशा परब्रह्माची उपासना करितात, ते देखील मत्स्वरूपाप्रतच पावतात. ( भ गी १२-३,४. )

( ३ ) परंतु ह्या निर्गुण ब्रह्मोपासनेचा मार्ग सगुणेशोपासनेपेक्षां अधिक क्लेशदायक असल्यामुळे देहधारी जीवाना ब्रह्मप्राप्तिस्तव फार कष्ट पडतात. ( भ. गी. १२-५ )

( ४ ) आणि मींच परमगति आहे, ह्या भावनेने अन्याश्रय न करितां आपुले चित्त मत्स्वरूपीं अखंड ठेवून जे भक्तियोगी पुरुष केवळ मदर्थ आपलीं सकल कर्में करीत असल्यामुळे मच्चिंतनापासून कधींहि भ्रष्ट होत नाहींत त्यांची ह्या जन्ममृत्युदायक संसारसागरांतून सुटका करण्याचें काम माझें,

असल्याकारणाने ज्ञानमार्गापेक्षा भक्तिमार्ग कमी क्लेशदायक आहे ( भ. गी. १२-६,७ ) सूत्रोक्त अन्याश्रयत्यागाचे सकल प्रयोजन ह्या गीतोपदेशांत आलें आहे. अर्थात् ज्ञानमार्ग आणि भक्तिमार्ग ह्या समबल द्विविधा ब्रह्मनिष्ठेंतील भक्तिमार्गाचे सौकर्य सांगण्यासाठींच प्रस्तुत सूत्र प्रवृत्त झालें आहे. असो.

**" देव भावाचा भुकेला। दास सेवकांचा झाला ॥ "**

ह्या तत्त्वाचे विवरण अंशतः झाले.आता त्याचाच आणखी विचार करूं.भावना शुद्ध असली, म्हणजे मग ती कोणत्या प्रकारे व्यक्त होत आहे. इकडे देव लक्ष देत नाहीं. अर्थात् देवाचे लक्ष कर्माकडे नसून भावनेकडे असते; कारण कर्म जड प्रकृतीचें असते आणि भावना आत्मिक असते.

नसे ठावा ब्रह्मा न शिव अथवा श्रीपति हरी ।
हरी जो तापाते उचलुनि कृपासिंधुलहरी ॥
हरी वाटे काळाकरिस विपती मृत्युभुजगा ।
जगाचा जो ऐसा धणि कवण तो पाव मजगा ॥

हा शुद्ध भावनात्मक धावा जरी भ्रममूलक होता, तरी तो संवादिभ्रम असल्यामुळें त्याने सर्वव्यापी, सर्वद्रष्टया सर्वसमर्थ, सगुण परमेश्वराचें मन वेधिले. प्रत्यक्ष व्यवहारांत देखील असाच अनुभव येतो एकाच स्त्रीवर माता ह्या नात्याने पुत्राचे प्रेम असते, भार्या ह्या नात्यानें पतीचे प्रेम असते, भगिनी ह्या नात्याने भ्रात्याचे प्रेम असते, कन्या ह्या नात्याने मातापित्याचे प्रेम असते, अशा प्रकारे अनेक भिन्न व्यक्तींचे भिन्न नात्याने एकाच स्त्रीवर प्रेम असून ती त्या भिन्न व्यक्तींशीं त्याच्या नात्याप्रमाणे आपलें प्रेमळ आचरण ( कर्म ) हि भिन्न प्रकाराने करीत असत. परतु " **प्रेम** " म्हणून जी वस्तु आहे, तिच्या स्वरूपांत त्या भिन्न आचरणानें भिन्नता मुळींच येत नाहीं. पुत्राच्या दुष्कृत्याबद्दल ज्या प्रेमानें ती त्याला प्रसंगवशात् ताडणहि करील,

त्याच प्रेमानें त्याच्या सत्कृत्याबद्दल ती त्याला आलिंगनहि देईल. ह्याचेच नांव समता. साखर आणि माती एक समजणे ही समता नाहीं. ते शुद्ध अज्ञान होय. ह्या " **प्रेम** " आणि " **समता** " नामक दोन्हीं गुणाचे उगमस्थान परमेश्वरच आहे, हे उमजून वामन पंडितानीं " **मुख्य धर्म समता दया । हे दोन्ही तुझे गुण अव्यया ॥ कर्मानुरूपें देवराया । फळें देसी भक्तातें॥**" असे आपल्या यथार्थदीपिकेत म्हटले आहे. आणि जगाच्या "**आदिकारणाचें**" "**अस्तित्व**" प्रत्यक्ष "**अज्ञेयवाद**" प्रस्थापित करणाऱ्या **हर्बर्ट पेन्सर** नामक विचारी पुरुषांनींहि कबूल केले आहे. ह्या आदिकारणासच वेदान्तशास्त्रांत जगाचे " विवर्तोपादान " म्हटले आहे. आतां त्याला **अज्ञेय** का म्हणावे ह्याचा विचार करूं. ज्या वस्तूचे ज्ञान झाले नाहीं, तिचे अस्तित्व कबूल करतां येत नाहीं. ते कबूल केले म्हणजे ती आहे, इतके तरी ज्ञान झालेच, असें कबूल करणे भाग आहे; आणि ती जगाचे " **आदिकारण** " आहे, असे म्हटलें म्हणजे तिच्या स्वरूपाचे अंशतः तरी ज्ञान झालेच, असेंहि सहजच ठरते. मग ती " **अज्ञेय** " कशी ? आतां " **अज्ञेय** " शब्दाचा " **अप्रत्यक्ष** " असा अर्थ जर केला, तर त्यात स्पेन्सरने अधिक काय सांगितलें ? " **यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसासह** " ह्या वेदान्त वचनाचा तोच अर्थ असून " **सुखमात्यंतिकं यत्तद्बुद्धिग्राह्यमतींद्रियम्** " ( भ गी. ६-२१ ) " **ये त्वक्षरमनिर्देश्यमव्यक्तं पर्युपासते । सर्वत्रगमचिंत्यं च कूटस्थमचलं ध्रुवं** " ( भ गी १२-३ ) इत्यादि वाक्यांत त्याचा अतिंद्रियत्व, अनिर्वचनीत्वादि गुणाचे वर्णन वेदान्त शास्त्राने करून ठेवलेच आहे मग स्पेन्सरसाहेबाना जरी त्याचे अनुभवज्ञान झाले नसले, तरी ते स्वतः सर्वज्ञ नसल्याकारणाने इतर (१) महाबुद्धिवान्, (२) महाज्ञानी, (३) महानुभाव आणि आणि (४) महावैराग्यशील अशा सर्वश्रेष्ठ अधिकारी पुरुषांच्या अनुभवजन्य **आप्तवाक्यास** मिथ्या म्हणण्याचा त्यांना न्यायतः अधिकार कसा प्राप्त व्हावा ? अतींद्रिय ज्ञान प्राप्त व्हावयास सर्वसंगपरित्याग

करून बहुत काळ चित्तैकाग्र्यरूप तप करावे लागते. ते न केलेल्या प्राकृतजनानीं वाटेल तर खुशाल सूर्यावर थुंकावे !

" वेदान्तशास्त्राचे एवढेच म्हणणे आहे कीं, अध्यात्मशास्त्रांतील विषय स्वसंवेद्य अतएव केवळ आधिभौतिक युक्त्यांनीं निर्णीत होण्यासारखा नसल्यामुळे अत्यंत शुद्ध, पवित्र आणि विशाल मनाच्या महात्म्यानीं या बाबतींत जो आपला अपरोक्ष म्हणजे साक्षात् अनुभव सांगितला आहे, त्याला जो युक्तिवाद विरुद्ध तो ह्या शास्त्रांत ग्राह्य धरितां येत नाहीं. आधिभौतिक शास्त्रात ज्याप्रमाणे प्रत्यक्षाला विरुद्ध असणारे अनुमान त्याज्य मानितात, त्याप्रमाणे वेदान्तशास्त्रात युक्तीपेक्षा सदर स्वानुभवाची किंवा आत्मप्रतीतीची मातब्बरी अधिक समजतात. या अनुभवाला जुळेल ती युक्ति वेदान्त्यास मान्य आहे.

अध्यात्मशास्त्रात उपनिषद्-ग्रथांचे महात्म्य विशेष का याचे कारणहि हेच होय मन एकाग्र कसे करावे याची प्राचीन काळीं हिंदुस्थानांत पुष्कळ भवति-न-भवति होऊन अखेरीस आमच्याकडे ( पातंजल ) योगशास्त्र नावाचें त्याचे एक स्वतंत्र शास्त्र बनले आहे. या शास्त्रात प्रवीण असून खेरीज स्वभावतःच ज्याचे मन पवित्र व विशाल अशा थोर थोर ऋषींनीं मन अंतर्मुख करून आत्म्याच्या स्वरूपाबद्दलचा आपला अनुभव किंवा त्या संबंधाने आपल्या शुद्ध व शांत बुद्धीला जे स्फुरण झाले तें उपनिषद् ग्रंथांतून सांगितले आहे.

( अपूर्ण )

# भावार्थ रामायणांतील वेचें

रामचंद्राने रावणाला मारल्यानंतर त्याला पोटाशी धरून त्याचा बंधु बिभीषण शोक करीत आहे, त्या हृदयद्रावक प्रसंगाचे व अशा प्रसंगीं स्वतः रामचंद्र त्याचे सांत्वन करीत आहे त्या उपदेशपर प्रसंगाचे गावबानीं केलेले वर्णन परमार्थदृष्ट्या प्रत्येकाने फार लक्षांत ठेवण्यातजोगे आहे.

**बंधु धरोनि पोटेंसीं । विलाप करी दुःखावेशीं ॥**
**बहु शिकविलें नायकेसी । व्यर्थ रामासी विरोधिलें ॥ ७७ ॥**
**दैवानुसार बुद्धि होये । तेथें तुज बोल काये ॥**
**जैसें प्राक्तन ओढिताहे । प्राणी वर्तताहे तेणें कर्में ॥ ७८ ॥**
**श्लोक-अथ खलु विषमः पुराकृतानां फलतिहि जंतुषु कर्मणां विपाकः॥**
**हरशिरसि शिरांसि यानिरेजुर्हरहर तानि लुठंति गृध्रपादे ॥**
**निजहस्तें करोनि जाण । निजशिरे छेदोनि पूर्ण ॥**
**शिवासी अर्पी रावण । तिहीं शिरीं रण वसविलें ॥ ७९ ॥**
**जीं शोभती शिव मस्तकीं । मुकुटमंडितजडित माणिकीं ॥**
**त्यांसी झडपिती पांखीं । निजकौतुकीं गीध घारी ॥ ८० ॥**
**जीं न खालावती ब्रह्मादिकां । जीं अजेय तिहीं लोकां ॥**
**तीं रणीं लोळती देखा । गोमायुका पायांतळीं ॥ ८१ ॥**
**निजप्रीतीच्या कल्लोळीं । शिवे धरियेलीं मौळीं ॥**
**तीं लोळती पायांतळीं । गीधमंडळी माझारी ॥ ८२ ॥**
**प्रारब्ध भोग बलवत्तर । त्यासी कांहीं न चाले सूत्र ॥**
**रणीं लोळतो दशवक्त्र । कर्म तंत्र सोडीना ॥ ८३ ॥**
**शंकर वरदें करून । लंकेचा राजा रावण ॥**
**त्याचीं शिरें धुळी माजी जाण । रणांगणीपूर्ण लोळती॥८४॥**
**निजहस्तें छेदोनि वहिलीं । जीं शिवमस्तकीं अर्पिलीं ॥**
**तीं दुष्टकर्में व्यापिली । गिधीं विदारिलीं घडे कैंवीं ॥ ८५ ॥**

तेची विषयीं उत्तर । श्रोते परिसोत सादर ॥
अति सूक्ष्म कर्म सूत्र । नव्हे गोचर सज्ञाना ॥ ८६ ॥

शिव सर्वस्वें सेविला । विष्णु सर्वस्वें द्वेषिला ॥
तेणें भेदें नागवला । डोल पडिला भजनासीं ॥ ८७ ॥

विष्णु शिवाचें निजध्येय । शंकर विष्णुचें हृदय ॥
उभयांसीं जो भेद पाहे । दुर्दशा लाहे नवल कोण ॥ ८८ ॥

ब्रह्मा धरोनि मुंगीवरी । शिव व्यापक चराचरीं ॥
विष्णु शंकरां बाह्यांतरीं । दोघां माझारीं भेद नाहीं ॥८९॥

विष्णु शिवाचे हृदय । शिव विष्णुचे अंतर्बाह्य ॥
निज देहासीं निश्चय पाहें । भेदाची सोय सांडूनीं ॥ ९० ॥

अनवच्छिन्न ऐसें पाहतां । त्यासी भय नाहीं सर्वथा ॥
निरसोनियां भयाची वार्ता । अक्षय्यता सुखरूप ॥ ९१ ॥

तैसें न करीच रावणु । भेद वाढविला शिव विष्णू ॥
वाढविला भजनाभिमानू । द्वेषिला विष्णू भेदबुद्धी ॥ ९२ ॥

विष्णूची निजशक्ति तत्वतां । पतिव्रता माउली सीता ॥
ते अभिलाषिली लंकानाथा । दुष्कर्पता आन कोण ॥ ९३ ॥

श्रीराम जगद्गुरु तत्वतां । त्याची निजशक्ति सीता ॥
अभिलाषितां लंकानाथा । गुरु तल्पगता सहजचि ॥ ९४ ॥

गुरुतल्पगते पुढें आन । पाप कोण आहे दारुण ॥
तेणें घोरकर्में रावण । गीध चरणीं पूर्ण लोळत ॥ ९५ ॥

भल्याचें शिकविलें नायके । तो सत्वाचें मुख केवि देखें ॥
अभिलाषितां रामनायिकें । हारविलीं सुखें महाभोग ॥ ९६ ॥

मंचक कनकाचा संपूर्ण । जडित रत्नीं सुलक्षण ॥
नवग्रहांची पाउटी जाण । तेथें दशानन शयनस्थ ॥ ९७ ॥

तें शरीर आजि येथ । सैरां रणभूमीसीं लोळत ॥
स्त्रक्चंदनें जे मंडित । तें विदारिती घारी गीध ॥ ९८ ॥
जडित अंगदीं प्रचंड । जे मंडित बाहुदंड ॥
त्याचे झालें खंड निखंड । रणीं वितंड विखुरले ॥ ९९ ॥
जिहीं भुजीं त्रिभुवन । बळे आकळिलें संपूर्ण ॥
तेहे रणांगणीं आवण । इतस्ततां जाण विखुरले ॥ १०० ॥
सूर्यप्रभेसमान मुकुट । मस्तकीं घाली दशकंठ ॥
त्याचें होवोनियां पीठ । रत्नें उद्भट विखुरलीं ॥ १०१ ॥
महाराजे मंडलवर्ती । ज्या चरणां नित्य नमिती ॥
ते तोडरेंसहित लोळती । रणाप्रती बंधुराया ॥ २
तुजसांगती शुकसारण । त्यांवरी कोपसी दारुण ॥
तेंचि सांगे प्रहस्त प्रधान । कोप दारुण तयावरी ॥ ३ ॥
तुझा पुत्र इंद्रजित । सांगतां त्यासी मारूं धांवत ॥
तसेंच कुंभकर्ण विनवीत । त्यासी निर्भर्त्सित अतिरागें ॥ ४ ॥
मंदोदरी निजकांता । न मानिसी तिच्या वचनार्था ॥
तेथे माझी कायसी कथा । हाणितल्या लाथा अतिरागें ॥ ५ ॥
तितुकाही मानिला विषाद । परी नकळे तुझा बोध ॥
रावण अद्वैत भक्त शुद्ध । निजानंद पावला ॥ ६ ॥
सकळ कुळा देवोनि मुक्ती । तुवां विरोधिला रघुपती ॥
बंधो तुझी अतर्क्य युक्ती । कळली निश्चितीं आजि मज ॥ ७ ॥
तत्काळ साधावया निजमुक्ती । सायुज्य साधिला रघुपती ॥
तें साधिले अतिनिगुतीं । सकळ संपत्ती अर्पूनी ॥ ८ ॥
होवोनि सर्वस्वा विरक्त । समारंगणीं लंकानाथ ॥
देखोनियां रघुनाथ । आनंदभरित झालासी ॥ ९ ॥

त्या आनंदाचे अतिप्रीतीं । राम जाणसी सर्वांभूतीं ॥
देह अर्पिला रघुपती । भूतसंतृप्ती लागूनी ॥ १० ॥
समो नागेन समोमशकेन । रावणा बाणलें संपूर्ण ॥
देह केला रामार्पण । विश्वमुखें पूर्ण तृप्तीसीं ॥ ११ ॥
करोनि देहाचें हविर्द्रव्य । विश्वमुखीं दशग्रीव ॥
अर्पितांची रघुराव । तृप्ति स्वयमेव पैं झाला ॥ १२ ॥
म्हणोनियां रावण । घारगीध मुखीं जाण ॥
आपणा विदारवी आपण । श्रीरघुनंदन सुखार्था ॥ १३ ॥
कुळ उद्धरिले सकळिक । तेणें बिभीषणा हरिख ॥
हर्षयुक्त करितां शोक । बोलों आणिक आदरिलें ॥ १४ ॥
पुष्पवाटिकेचें उद्यान । क्षणें विध्वंसी पवन ॥
तेंवी क्षणमात्रें रामें जाण । ससैन्य रावण निवटिला ॥ १५ ॥
महामत्त मातंग जैसा । कोणाही नागवे सहसा ॥
रावण मत्तमहागज तैसा । राघवेशा आतुडला ॥ १६ ॥
महामत्त वडवानळू । कोणी नशके आकळू ॥
त्यासी वर्षोनि घनसबळू । अग्नीकल्लोळ करी शांत ॥ १७ ॥
तेवी श्रीराम मेघे करून । रावणाग्नि विझविला पूर्ण ।
अष्टांगांचे कोळसे जाण । शोभती संपूर्ण रणांगणीं ॥ १८ ॥
ऐसें नानापरी बहुत । बंधुपुढें घेवोनि तेथ ।
बिभीषण विलाप करित । हृदयपिटित निजकरें ॥ १९ ॥
तें देखोनि रघुनंदन । संबोखीतसे आपण ॥
शास्त्र रीतीं लौकिक वचन । शांतवन अतिप्रीतीं ॥ २० ॥
व्यर्थ न करीं शोकातें । न व्हावें झालें निरुतें ॥
सावध होवोनि निजचित्तें । सांडीं परते मोहासी ॥ २१ ॥

घटामाजी भरलें जळ । त्यांत बिंबलें चंद्रमंडल ।
काळे वेंचल्या घटजळ । बिंब तत्काळ हरपलें ॥ २२ ॥
त्या बिंबा लागीं आपण । शोक करितां दारुण ।
तेथें श्रमचि उरे जाण । बिंब पूर्ण नये हाता ॥ २३ ॥
घटा माजी बिंब असतें । शोक करितां तें भेटतें ।
तेंवी धरिलिया प्रेतातें । रावण तेथें भेटेना ॥ २४ ॥
बिभीषणा ऐका विनंती । शोक करिता तुजप्रती ।
न भेटे गा लंकापती । सांडीं निश्चितीं भ्रमातें ॥ २५ ॥
तूं विवेकसंपन्न राजा । इतरां उपदेश व्हावा तुझा ।
तो तूं तेथें मोह समाजा । निमग्न काजा पैं कवण ॥ २६ ॥
ज्यासीं होय अवगती । अवश्य त्याची करावी क्षती ।
उसण्या घायीं जे निमती । ते वंद्य होती सुरनरां ॥ २७ ॥
रावणें करोनि ख्याती । समरांगणीं सर्व शक्ती ।
तुच्छ करोनि देहस्थिती । ब्रह्मस्थिती साधिली ॥ २८ ॥
महायोगी कामक्रोध । जिणोनि साधी परमानंद ।
तेवी रावणें निजपद । करोनि युद्ध साधिलें ॥ २९ ॥
वाणीचा होथा दशमुख । तो झाला विश्वमुख ।
त्याचा करूं नये शोक । निज विवेक विचारीं ॥३०॥
म्हणोनि शोका योग्य रावण । सर्वथा नव्हे नव्हे जाण ।
तूं बिभीषण सर्वज्ञ । व्यर्थ रुदन सांडीं परतें ॥ ३१ ॥
गेलियाचा शोक करितां । लागोपाठे मूर्खता ।
ते सांडोनियां सर्वथा । बंधुस्वधर्मता साधावो ॥ ३२ ॥
रावणाचे और्ध्वदेहिक । तुवां करावें आवश्यक ।
गोत्रज पुत्र निमाले देख । कर्ता आणिक दिसेना ॥ ३३ ॥

जो देवद्रोही वेदद्रोही । मुख्य ब्रह्म याचा ब्रह्मद्रोही ।
त्याचा शोक सर्वथा पाहीं । शास्त्रें नाहीं बोलिला ॥ ३४ ॥

तू बिभीषण सविवेक । सांडोनियां दुःखशोक ।
करी बंधूचें और्ध्वदेहिक । व्यर्थ दुःख करोनि काय ॥ ३५ ॥

श्लोक–सतस्य वाक्यैः करुणैर्महात्मा संबोधितः साधु बिभीषणश्च ।
आज्ञापयामास नरेंद्र सूनुः स्वर्गार्थमाधानमदी नसत्त्वम् ॥

ऐसें सांवळेनि सुंदरे । बुद्धिबोधप्रबोधचंद्रें ।
सूर्य वंश प्रभाकरें । दशरथ कुमरे बोलिले ॥ ३६ ॥

जो ईश्वरा ईश्वर । जो योगियांचा योगेश्वर ।
जो नरेंद्राचा नरेंद्र। तो रघुवीर बोलिला ॥ ३७ ॥

ज्याचें ऐकतां वचन । उपनिषदां पडे मौन ।
सद्यचित्त चमत्कारें पूर्ण । समाधान जीवशिवां ॥ ३८ ॥

तेणे श्रीरामें आज्ञापितां । मोह गेला न दिसे केउता ॥
सावध होऊनि तत्वतां । झाला करिता उत्तरःविधा ॥ ३९ ॥

सत्वाथिला अति सात्विक । बिभीषण परम धार्मिक ।
श्रीराम वचने देख । मोह निःशेख सांडिला ॥ ४० ॥

जेवी उगवतां दिनमणी । सचंद्र ताराहर पती रजनीं ॥
तेवी श्रीरामवचनें करूनी । मोह तत्क्षणीं पळाला ॥ ४१ ॥

सावध होउनि मानसीं । अनुसरोनि रामवचनासी ।
आनंदमय रणभूमीसी प्रेतदहनासी होय करिता ॥ ४२ ॥

भावार्थ रामायण युद्धकांड अ. ६४ ओ. ७७ । १४२.

देहात्मत्व-भ्रम गौणात्म्याते होई । तेणे गुप्त राही आत्मज्ञान ॥ ६६ ॥
तयाच्या ज्ञानार्थ करणीय कर्म । तेचि की **स्वधर्म** सर्वत्राचा ॥ ६७ ॥
देहासवे कर्म निपजे सहज । तेचि स्वभावज अनावर ॥ ६८ ॥
प्रारब्धेचि होई त्या ठायीं प्रवृत्ति । तयाची निवृत्ति शक्य नसे ॥ ६९ ॥
ईशनियमाने उपजे प्रारब्ध । सञ्चितांश-बाध तेणे होतो ॥ ७० ॥
त्यावीण जे कर्म तेचि **क्रियमाण** । तें नोहे निर्माण **इच्छेविना** ॥ ७१ ॥
म्हणून जो **काम** विशुद्ध सात्विक । तोचि पुण्यात्मक एक असे ॥ ७२ ॥
रजतमोद्भूत **काम** पापात्मक । शुद्धात्मघातक असेचि तो ॥ ७३ ॥
गुणमयी माया मायोद्भूत जग । नसे तेथे लाग आत्मयाचा ॥ ७४ ॥
प्रपंची प्रवृत्ति तीच दुःखात्मक । चिदानंदात्मक नाहींच ती ॥ ७५ ॥
विशुद्ध सात्विक असे एक हरि । तयावीण वारी माया कोण ॥ ७६ ॥
भौतिक सुखांते लाचावूनि जग । सोडीतसे मार्ग ईश्वराचा ॥ ७७ ॥
अनंत जनांत एखादाचि सोडी । प्रपंचाची गोडी ईश्वरार्थ ॥ ७८ ॥
शास्त्रोक्त साधने सफल जै होती । सिद्धावस्थाप्राप्ति तेव्हा होते ॥ ७९ ॥
अनंत संसिद्ध त्यामाजी विरळा । भोगितो सोहळा आत्मैक्याचा ॥ ८० ॥
सदा सुखी जगीं असताती संत । जोडोनी अनंत भक्तिमार्गें ॥ ८१ ॥
प्रपंच्याच्या योगे पूर्ण सुखी झाला । ऐसा आयकिला नाहीं कोणी ॥ ८२ ॥
सर्व भयांमध्ये श्रेष्ठ मृत्युभीति । तिची नसे वस्ती संतापाशीं ॥ ८३ ॥
ह्याच देही मुक्त होऊनिया संत । साधिता अनत एकात्मत्वे ॥ ८४ ॥
जन्म जरा मृत्यु देहाच्या आपदा । देहातीता कदा न बाधती ॥ ८५ ॥
ऐशी स्वये साक्ष देत असे तुका । तेथे कोण लेखा अन्य भया ॥ ८६ ॥
भक्तीच्याचि द्वारे ब्रह्मात्मैक्य योगें । ऐशी शांति लागे संतापायीं ॥ ८७ ॥
संत सदा मुक्त देहत्रय छिन्न । देहदुःखां कोण तेथे पुसे ॥ ८८ ॥
देहप्रारब्धाते देहामध्ये ठाव । देह होता वाव न प्रारब्ध ॥ ८९ ॥

परी मूढजन संताते लाविती। देहदुःखावाप्ति निजज्ञाने ॥ ९० ॥
त्यांच्या समाधाना बोल कीं हे फिके। " प्रारब्ध न चुके मुक्तांनाहि ॥ ९१ ॥
भौतिकवाद्यात ऐसा समाधानी। देखिला ना कोणी नायकीला ॥ ९२ ॥

**यं यं वापि स्मरन्भावं त्यजंत्यंते कलेवरम्।**

**तं तमेवैति कौंतेय सदा तद्भाव भावितः** ॥ गीता ८–६ ॥

प्रपंचीं जो रत तया निदिध्यास। प्रपंचाचा खास होत असे ॥ ९३ ॥
ज्याचा निदिध्यास तयाचीच स्मृति। होते आयुष्यांतीं निःसशय ॥ ९४ ॥
जीवा जीवनांतीं ज्याची होई स्मृति। तयासम गति तया लाभे ॥ ९५ ॥
प्रपंचाचे ठायीं मन नसे जेव्हा। प्रपंचचि तेव्हा ओसरतो ॥ ९६ ॥
ह्यासाठीं प्रपंचीं धरूनि विरक्ति। **नित्ययुक्त** स्थिति आदरावी ॥ ९७ ॥
ऐशा भक्तियोगे ब्रह्मात्मैक्य होते। **मोक्ष** हे जयाते दुजे नाम ॥ ९८ ॥
ऐशा भावे तुका वदला जी उक्ति। ती आता पुढतीं पहावी जी ॥ ९९ ॥

**भाग्यवंत म्हणे तया। शरण गेले पंढरिराया** ॥

ईशप्रसादाने सच्चित्सुख लाभ। नाम जया शोभे विद्याधन ॥ १०० ॥
जडद्रव्ययोगें श्रीमान् जे दिसती। तया नसे शांति अंतरीची ॥ १०१ ॥
प्रत्यक्षानुभव सच्चिदानंदाचा। देईना ती वाचा शंखध्वनि ॥ १०२ ॥
नादे सदा सुख वाढवूनि **काम**। तीते **"विद्या"** नाम कैसें साजे ? ॥ १०३ ॥
ईशाचे भूषण होऊनियां राहे। ती लक्ष्मी न होये दुःखसंगी ॥ १०४ ॥
ऐसे उमजोनी मानिताती संत। जडद्रव्यानत दुःखमूल ॥ १०५ ॥
आम्हीं संतदास न त्या मान देऊं। दृष्टिहि न ठेवू तयावरी ॥ १०६ ॥
गुरुपदीं राहूं **नित्ययुक्त** ऐसे। मग आम्हा कैसे दन्य बाधे ॥ १०७ ॥
नसो मदंतरीं जडाचा ता वास। म्हणे साईदास रामय्या ह्या ॥ १०७ ॥

॥ ॐ तत्सद् साईनाथार्पणमस्तु ॥

## —आरती—

दयाळा साईनाथा । पूर्ण करी मनोरथा ॥
तवपदीं भक्तिभावे । आलों शरण मीं आता ॥ दयाळा० ॥ १ ॥
संसारीं गुंतलासे । तुझा दास हा पतीत ॥
पावना त्याजला तूं । नको करूं हतचित्त ॥ दयाळा० ॥ २ ॥
संसार हा सांगोपांग । ह्याच जन्मीं सरो बाबा ॥
त्यापुढे मज देई । ज्ञानवैराग्य ठेवा ॥ दयाळा० ॥ ३ ॥
अखंड सत्संगाचे । जन्मांतर मज द्यावे ॥
मजकरवीं गुरुराया । साधुपरित्राण व्हावे ॥ दयाळा० ॥ ४ ॥
खलसंहारक मजला । करूनीयां धर्म रक्षी ॥
कृपामेघबिंदु ह्याच । मागे कीं हा चातक पक्षी ॥ दयाळा० ॥ ५ ॥
ऐशापरी प्रपंचाते । सारूनीया लीन व्हावें ॥
सच्चिदानंदरूपीं । हेचि दान मज द्यावे ॥ दयाळा० ॥ ६ ॥
आत्मज्ञ तूं त्रिसत्य । परमेश ब्रह्मरूपी ॥
सद्गुरो तारी मज । अंतीं नेई स्वस्वरूपीं ॥ दयाळा० ॥ ७ ॥
हीच एक भिक्षामुष्टि । मागे होऊनीया कष्टी ॥
तव दास रामय्या हा ॥ द्यावा त्याजला तुष्टि ॥ दयाळा० ॥ ८ ॥

## —गुरुप्रसादोद्गार—

( प्रथमोल्लास )

**॥ ॐ श्रीसाईनाथ गुरुवे नमः ॥**

**॥ ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव ना परः ।**

" **माया–ब्रह्म** " नामे, " **क्षेत्रक्षेत्रज्ञ** " अन्य हीं असती ।
" **प्रकृतिपुरुष** " हीं तैशीं, "**देह**" न "**जीव**" हि तदन्य संभवती ॥ १ ॥
माया ( विश्व ) प्रतिबिंबिप जे, " **ब्रह्म** " तया नाम " **ईश** " हेंचि **असे** ।
**देह**प्रतिबिंबित जो, " **आत्मा** " त्याहूनि " **जीव** " भिन्न नसे ॥ २ ॥
घट मठ ह्यांच्या योगे, महदाकाशात भेद जो दिसतो ।
मिथ्या–भास असे तो, अवकाश अभेद्य तत्वता असतो ॥ ३ ॥
**ब्रह्मात्मैक्य** असे वा, **जीवेशैक्यहि** जधीं जिवास कळे ॥
**जीवन्मुक्त** तधिंच तो, निजरूपें होय हे तया विवळे ॥ ४ ॥
**त्रिगुणमयी** जी **माया** न तिचा स्पर्शहि असे **परब्रह्म** ।
मायानिर्मित **देहस्पर्शित** नसतो कदाचि **जीवात्मा** ॥ ५ ॥
मायानिर्मित हे जग, असे सदा ते अनेकरूपत्वे ।
दिसते तें नासतसे, वसे कदा ते न एकरूपत्वें ॥ ६ ॥
अस्थिर अनिश्चित असे, रूप जगाचे न नित्यता त्याला ।
रूप अचिंत्यचि ह्यास्तव, **विश्वा** मिथ्यात्ववाद हा आला ॥ ७ ॥
दिसते प्रवाहरूपे, समता परि न च अनन्यता त्यातें ॥
सत्यस्वरूप त्याचे, नित्य न काणास अनुभवा येतें ॥ ८ ॥
असतचि ऐसें असुनी, जडात्मता ती तयांत पूर्ण असे ।
**जीवाविण** त्यांत किमपी, चिन्मयतेचा कदाहि वास नसे ॥ ९ ॥
चिद्भाव नित्य जेथे, आनंदहि तो दिसे न त्या ठायीं ।
सचित् आनंदाला, आत्म्याविण अन्य ठाव न च कांहीं ॥ १० ॥

मायोद्भव विश्व असे, जड नश्वर देहही असे तैसा ।
सच्चित् आनंद तया, देहीं राहील हो कदा कैसा ? ॥ ११ ॥

अंतर्बाह्य असति जीं, स्थूला स्थूलेचि इंद्रिये देहीं ।
जडरूपचि तीं असती, अनुभव ऐसाचि निद्रिता देई ॥ १२ ॥

प्राणहि तसा असे जड, देहप्राणेंद्रियांस सकल जडां ।
आत्मप्रभाचि हलवी, जड बुद्धिस योजुनी तया अजडा ॥ १३ ॥

सूर्यप्रकाशयोगे, सृष्टिव्यापार चालतो सारा ।
सूर्यासमचि **अकर्ता, आत्मा** कर्मा न दे कदा थारा ॥ १४ ॥

**ज्ञानी आत्माचि** असे, ह्यास्तव सहजे अकर्तृता उभयां ।
कर्मज्ञानसमुच्चय, ह्या न्याये जातसे सदा विलया ॥ १५ ॥

ज्ञानी, अव्यक्ताक्षर निर्गुण असुनी रमे निजानंदीं ।
व्यक्तक्षरमायेच्या, कदाहि न पडे गुणाचिया फंदीं ॥ १६ ॥

आत्मा अनित्य म्हणता, ब्रह्माची नित्यताचि भंगतसे ।
ब्रह्मात्मैक्य उमजल्या, नास्तिक वादा न ठाव राहतसे ॥ १७ ॥

आत्म्याची चिन्मयता, तज्ज्ञातृत्वे सदाचि व्यक्त असे ।
ज्ञातविषयभिन्नत्वे, चिन्मयता नष्ट किमपि होत नसे ॥ १८ ॥

आनंदात्मक आत्मा, दुःखाभावे प्रसिद्ध होत असे ।
मायेविण सुखदुःखा, किमपिहि कोठे कदाचि ठाव नसे ॥ १९ ॥

देहप्राणेंद्रियमनसंघासह ते विकार असति सदा ।
अविकार्य असे आत्मा, जो त्या संघे न होय युक्त कदा ॥ २० ॥

पूर्ण **ब्रह्मानंदीं**, समाधियोगेच **लागली टाळी** ।
तरि मग **कोण** कसा ह्या, **देहाते** विसरुनीहि **सांभाळी** ? ॥ २१ ॥

प्राणेंद्रियमनदेहीं, **प्रारब्धाच्या बळेंचि** जीं कर्मे ।
ज्ञानाच्या दिसताती, तीं भस्मचि होत असति निजधर्मे ॥ २२ ॥

ज्ञानें **क्रियमाण** झडे, **संचित** तेही जिरोनिया जाते ।
ऐशापरि **कर्मत्रय, समूळ जळुनी विमुक्तता** येते ॥ २३ ॥
मायिक सुखदुःखे जीं, ज्ञानबले जाहलीं असत्य जयां ।
कवण्या कार्यारंभा, योजूं शकतील तीं पुढेहि तया ? ॥ २४ ॥
होऊनि **अकर्ता** जो, **ज्ञानबलें मुक्त** आत्मया पाही ।
द्वैताचा भावचि मग, त्याच्याठायीं कदापि नच येई ॥ २५ ॥
स्थितधीची जी समता, अद्वैते ती सुबुद्धिला **खिळते** ।
अन्याने चाळविल्या-विना स्वतःती कदापि न च चळते ॥ २६ ॥
ह्यास्तव मुमुक्षुने ती, भक्तिबले आणि उचित समयाला ।
चाळविजे स्वार्थास्तव, भाविक ठेवोत ह्या मनीं बोला ॥ २७ ॥
ज्ञानोपदेशयोगे, अज्ञानाची करीतसे होळी ।
पुनरपि आत्मसमाधिस, **योगी** सहजचि उदंड साभाळी ॥ २८ ॥
ऐशी स्थिति योग्यांची, जागोजागींच वर्णिली हरिने ।
गीतत ती पहाता, न कळे वर्णावि कोणत्या परिने ॥ २९ ॥

**ॐतत्सच्छ्री साईनाथार्पणमस्तु**

( द्वितीयोल्लास )

## —ॐ नमः श्री सद्गुरु साईनाथाय—

### "एकमेवाद्वितीयम् ब्रह्म"

**आत्मा अद्वैत** असे, सद्भावाला तदन्य ठाव तोचि नसे ।
चिन्मयता सद्भावीं, आनंदातेहि ठाव असे ॥ १ ॥
दुग्ध जसें श्वेत दिसे, आर्द्र असे आणि मधुरही वाटे ।
सच्चित् आनंदत्वहि, आत्म्यामाजीं सदा तसे थाटे ॥ २ ॥
सच्चिन्मय आनंदा, मुख्यात्म्याच्याचि ठायिं वास असे ।
ब्रह्मात्मैक्य उमजल्या, ब्रह्माविण ह्या जगीं न किमपि दिसे ॥ ३ ॥

ब्रह्म खरे जग मिथ्या, ऐसे अद्वैत मानसे वरिल्या ।
लौकिक कर्मांच्या मग, फेऱ्या सकलहि सदाचि त्या सरल्या ॥ ४ ॥
**अजडात्मा जड हे जग**, कर्म जडामाजि ते सदा राहे ।
त्या कर्माचा स्पर्शहि, आत्म्याला किमपि नच कदा साहे ॥ ५ ॥
अद्वैतीं द्वैत नसे, द्वैताविण कर्म ना कुणीच करी ।
देहप्रारब्धाचा, देही किमपि न कदाहि संग धरी ॥ ६ ॥
संगाविण कर्म घडे, अकर्म हे अन्य नाम त्यास असे ।
जड जग मिथ्याभावे, कळल्या मिथ्या न होय कर्म कसे ? ॥ ७ ॥
जाड्यामाजीं **श्रद्धा**, असल्याविण कर्म केविं कोण करी ? ।
श्रद्धा जाड्यीं असता, अज्ञानचि तेथ नित्य ठाव धरी ॥ ८ ॥
प्रारब्धाविण किमपिहि, न क्रियमाणीं सुसिद्ध बुद्धि वसे ।
अद्वैतसिद्ध बुद्धिस, भक्तीविण कार्य न च कदापि असे ॥ ९ ॥
नैष्कर्म्यसिद्धि लाभे, भक्तीने जीस **योग** नाम असे, ।
मग पुढतीं ईशकृपे, जीवेशैक्यासि सिद्ध पावतसे ॥ १० ॥
क्षेत्रक्षेत्रज्ञांचे, ज्ञान खरे जे अलभ्य अविरागे ।
शब्दातीत असे ते, पूर्णत्वे नासते विषयरागे ॥ ११ ॥
तन्मयता आत्म्याशीं, नोहे तोंवरिच जाड्य बाधतसे ।
त्याग जडाचा झाल्या-वरि पुढती आत्मलाभ होत असे ॥ १२ ॥
अजडचि शुद्धत्वानें, राहेना तोंवरी न जाड्य सरे ।
ताकाचा बिंदु जरी, पडला दुग्धांत तेच दुग्ध विरे ॥ १३ ॥
अजडात्मा जड हे जग, ह्यांचे मिश्रण जया मनीं वसते ।
शुद्धात्मभान तेथे, सत्यत्वे राहिना संतत नुसते ॥ १४ ॥
शुद्ध रजोद्भूत असे, जो **ऐहिक काम** तोचि वर्ज्य खरा ।
धर्मानुगामि असतो, तो मान्यचि होय खचित देववरा ॥ १५ ॥

**प्रस्थापन सत्याचें, तैसे खंडनहि तें असत्याचें ।**
त्यांतें म्हणतां **निंदा**, सत्य निसंतान होत सत्याचे ॥ १६ ॥
आद्य श्लोकीं भारतिं, निजात्मया वंदिले मुनि व्यासे ।
**अभिमान** होइना तो, ब्रह्मात्म्या वदिता असे खासे ॥ १७ ॥
करि **सत्याचें रक्षण, दांभिक वादासि जो पुरा जाळी ।**
ऐशाच्या **सत्कार्यें**, तुष्टिच पावे सदाहि वनमाळी ॥ १८ ॥
सिद्धावस्थेसाठीं, साधनमार्गें न कोणि यत्न करी ।
मायामोहित होऊनि, अज्ञानाचाचि लोक मार्ग धरी ॥ १९ ॥

जया मनीं राम सदा वसेना ।
तयासि होती बहु कष्ट नाना ॥
अशा मनीं ऐहिक काम राहे ।
सिध्यर्थ त्याच्या बहु कष्ट वाहे ॥ २० ॥

ज्याच्या मनीं भाव खरा असेना ॥
त्यांच्या मनीं तामस वृत्ति नाना ॥
त्या वृत्तिनीं लोक भुलोनि ठेला ॥
मोहामुळे राम लपोनि गेला ॥ २१ ॥

न होय दुबळ्या जनासि बहुधा खरें ज्ञान ते ॥
म्हणोनि लुटण्या तयां असुरवृत्ति फोफावते ॥
धरोनि मनि कामना असुर वंचिति ह्या जगा ॥
न जे उमजती असे, असुर त्यांसि देती दगा ॥ २२ ॥
न दांभिकपणाविना जग कधीं भुले राक्षसा ॥
म्हणोनि अपुल्या श्रमा मिरवितात्ति सत्पक्षसा ॥
अशा कुटिल नीतीने स्वहित साधिती नीच ते ॥
नसे मिति तयांचिया अखिल तामसी नीचते ॥ २३ ॥

" यं योगिनः प्राणवियोगकाले । यत्नेन चित्ते विनिवेशयंति ॥
साक्षात्पुरस्ताद्धरिमीक्षमाणः । प्राणान् जहौ प्राप्तकालोहि भीष्मः " ॥
भीष्मस्तवराजः ॥

## साकी

" योगेनान्ते तनुत्यजाम् " ह्या, रघुवंशांतिल बोला ॥
ठेवियल्या मनिं खरा योग तो, समजा उमजुनि आला ॥ २५ ॥

" अंतकाले च मामेव स्मरन्मुक्त्वा कलेवरम् ॥
यः प्रयाति स मद्भावं याति नास्त्यत्र संशयः " ॥ २६ ॥ अ० ८, गी.

" यं यं वापि स्मरन्भावं त्यजत्यंते कलेवरम् ॥
तं तमेवैति कौंतेय **सदा** तद्भाव भावितः " ॥ २७ ॥ अ० ८, गी.

" **तस्मात्सर्वेषु कालेषु मामनुस्मर** युद्धच ॥
" मैय्यर्पितमनोबुद्धिर्मामेवैष्यस्यसंशयम् " ॥ २८ ॥ अ० ८, गी.

" सदा सर्वदा योग तुझा घडावा । तुझे कारणीं देह माझा पडावा " ॥
समर्थोक्ति ही योग शब्दार्थ सांगे। न जावो कुणी वंचकांच्याचि मार्गें ॥ २९ ॥

नामीं नेमी वाचा, ध्यानीं मानस सदाचि जो नेमी ॥
पूर्णेंद्रिय दमनाने, सहजचि पावेल तो **स्वसुखधामीं** ॥ ३० ॥

ज्ञान्याच्या निजरूपा, दावुंनिया मज समर्थ सद्गुरुने ॥
गीतार्थ सिद्ध केला, जो कथिला अर्जुना जद्गुरुने ॥ ३१ ॥

गुणचि गुणीं वावरती, ऐसे उमजूनिया अहंकारा ॥
कर्मी ठाव न देऊं, सोडूं आम्हीं न शांतिचा थारा ॥ ३२ ॥

सांई कृपा जहाली, महात्म्य तीचे न वर्णवे वाचें ॥
गुरुदर्शन झालें ज्या, पुण्यानें ते समस्त वडिलांचें ॥ ३३ ॥

**ॐ तत्सच्छ्री सांइनाथार्पणमस्तु.**

( तृतियोल्लास )

## ॥ ॐ श्रीसांइनाथ चरणारविंदाभ्यां नमः ॥

नाहं वसामि वैकुंठे योगिना हृदये रवौ ॥
मद्भक्ता यत्र गायंति तत्र तिष्ठामि नारद ॥

भक्ति असावी कर्मी, हाच असे हेतु **कर्मयोगाचा** ॥
**श्रद्धावान्भक्त** नसे, हरि न म्हणे त्यास **युक्ततम** साचा ॥ १ ॥
**सततचि हरिभजन करी, तोचि** असे **नित्ययुक्त** सत्यत्वें ॥
ऐसें गीताचि वदे, असुरचि मानीत ते असत्यत्वे ॥ २ ॥
जरि मानसीं न राहे, हरिस्मरण ते अखंड निसत्वे ॥
तरि काय नेम आहे, कीं अंतीं होय ते अनन्यत्वें ? ॥ ३ ॥
हरिविणचि भाव अंतीं, मनिं आला तरि गतीहि तत्सम ये ॥
भाव मनीचा अंतीं, जैसा तैसा पुढील ठावहि ये ॥ ४ ॥
ह्या साठीं भक्तीला, प्राधान्य दिले असे सकल कर्मी ॥
भक्त्यनतुकूल असती, कर्में तीं त्याज्य होत निज धर्मी ॥ ५ ॥
पुरुषार्थवर असे हा, कीं अंतीं मुक्तिलाभ मिळवावा ॥
आसुरबुद्धि–अनार्था, हा हेतू कोणिं केविं मिळवावा ॥ ६ ॥
**भक्तांनाचि** हरि म्हणे, **सुकृती** तेणेचि सुचविता ऐसे ॥
**नोहे अभक्त सुकृती,** त्यागावे सद्रहस्य हे कैसे ॥ ७ ॥
ज्ञान्या आणिक भक्तांविना **महात्मा** न होय कोणि कदा ॥
हें दावितसे गीता, तत्त्व अबाधित असेचि हेहि सदा ॥८ ॥
भक्तांविण तो श्रीहरि, **उदार** न म्हणे कदापि कोणातें ॥
भाविक पुरुष तुम्ही हो, ह्यातिल तत्त्वहि सदाचि जाणा ते ॥ ९ ॥
“ **भक्ति प्रधान** ” म्हणतां, कर्मा गौणत्व येतसे सहजे ॥
“ **भक्तिप्रधान योगीं,** ” असुरांना न्याय कदा नुमजे ॥ १० ॥

क्षत्रक्षेत्रज्ञांच्या, स्वानुभवावीण चित्त्व उमजेना ॥
शब्दज्ञाने साप्रत, त्याची झाली असे पुरी दैना ॥ ११ ॥
ज्ञान्या स्वात्माचि म्हणे, श्रीहरि आणिक बोधितो सकळां ॥
कीं स्वात्मानुभवी गुरु, मिळल्याविण लाभते न आत्मकळा ॥ १२ ॥
गुरुच्या प्रसन्नतेविण ज्ञान वदे हरि कदा न होत असे ॥
गुरुची प्रसन्नता ता, तद्भक्तीविण कदा न लाभतसे ॥ १३ ॥
गुरुचा प्रसाद नोहे, तरि दाविल कोण केवि चित्त्व खर ॥
स्वात्मानुभवचि नाहीं, त्यापासुनि ते मिळेल केवि बरें ? ॥ १४ ॥
गुरुभक्तिच ती साधन, आत्मज्ञान असे मुमुक्षते ॥
ह्या हेतुने दावी, श्रीहरि भक्तिच मुमुक्षुचक्षूते ॥ १५ ॥
भक्तिप्रधान कर्मापासुनि सद्भक्ति नित्य वाढतसे ॥
यज्ञातिल **सत्त्व** हरिच, ह्यास्तव गीतेत सर्व काढितसे ॥ १६ ॥
अव्यक्तरूप जो हरि, त्याचे अव्यक्त फलद यज्ञाने ॥
केलें श्रद्धापूर्वक, यजन तरिच उद्धरीत प्रज्ञाने ॥ १७ ॥
प्रज्ञानदान करण्या, गुरुरूपें पावतोचि निजभक्तां ॥
कार्य तयां अन्य नसे, व्यवहारासक्ति नसत ज्यां मुक्तां ॥ १८ ॥
**ऋतु- यज्ञांचीं रूपें, हरिचीं** ऐसेच वदतसे **गीता** ॥
**भोक्ता यज्ञाचा हरि, अधियज्ञहि हरिच,** ती कथी वार्ता ॥ १९ ॥
ऐसे वदूनि गीतायज्ञां प्राधान्य देइ **जपयज्ञा** ॥
अनुसंधाने इतुक्या देइ मुमुक्षूस **यज्ञकर्माज्ञा** ॥ २० ॥
प्रारब्ध अपरिहार्य क्रियामाणीं फक्त **यज्ञ तप दाना** ॥
अवकाश देइ हरि परि, वदत **जपाची सरी नये आना** ॥ २१ ॥
गीतेच्या सप्तदशाध्यायीं **तप** यज्ञ. **दान** वर्णूनो ॥
हरि वदतो **वैदिक तीं,** ईश निजे राहतोचि पर्णूनि ॥ २२ ॥

भक्तिप्रधान कर्मे, ऱ्हाया वैराग्य लागतें भारी ॥
स्तव **निस्त्रैगुण्यचि**, उपदेशी आद्य तो मुरारि हरी ॥ २३ ॥
वैराग्यपूर्णमूलक, ईशार्थ ( यज्ञार्थ )चि कर्म केलिया ऐसे ॥
अनहंकार बळावुनि, ईशकृपे ज्ञानलाभ होत असे ॥ २४ ॥
कर्मारंभ जरि घडे, लौकिक कार्यार्थ तरि अहंकारें ॥
**संचित** वाढत जाउनि, चुकती ना जन्ममृत्युचे फेरे ॥ २५ ॥
**सहज स्वाभाविक** जीं प्रकृति निर्मित होत तीं **कर्में** ॥
**प्रारब्धबलें घडती**, जाळिति तीं संचितांश निजधर्में ॥ २६ ॥
**क्रियमाण** यज्ञ जप तप, पुण्याच्या संचयासि तीं करितो ॥
शास्त्रान्वयेचि करिता, लौकिक कर्में क्षयास तीं जाती ॥ २७ ॥
**लौकिक** अनुक्त कर्मी, **शास्त्रप्रामाण्य** साधका बोधी ॥
गीता तद्योगे ती, **मनुस्मृतिस** घेतसे निजस्कंधीं ॥ २८ ॥
वाढे पुण्य जळे अघ, ज्यायोगे जीव येतसे जन्मा, ॥
पुण्ये ज्ञान उपजल्या, ठाव नसे मग तया पुनर्जन्मा ॥ २९ ॥
स्थितधी वा भक्तोत्तम, तेवि गुणातीत आणि ते ज्ञानी ॥
कर्मातीत असोती **आरंभ** घेतिना कदा स्वमनीं ॥ ३० ॥
गीतेच्या इत्यर्था, उमजुनि घेईल जो यथार्थत्वे ॥
ह्या गीत्युनुरोधाने, होइल तो **देवमान्य** सत्यत्वें ॥ ३१ ॥
श्रीशा वदुनि तुजला, मागतसे एक भिक मी राया ॥
अवतार धरुनि यावे, साधूंचा रिपुसमूह माराया ॥ ३२ ॥
शब्दकुसुममाला ही श्रीसांईसीच अर्पिली भावें ॥
रामय्या दासाने , कर्मक्षय वांच्छुनी मनोभावें ॥ ३३ ॥

**॥ ॐ तत्सच्छ्री सांइनाथार्पणमस्तु ॥ शुभं भवतु ॥**

मुंबईंतील आमच्या एक मुक्कामांत आम्हीं गिरगाव रस्त्याने जात असता, अक्कलकोट फाईन आर्ट गॅलरीच्या दुकानांत बाहेरचे बाजूस एक सुंदर राधाकृष्णाची तसबीर लाविली होती ती पहात उभे राहिलों. दुकानचे मालक रा. धोंडो जगन्नाथ नाईक यांनीं आम्हांस पाहून दुकानात बोलाविले. दुकानांत आम्हीं गेल्यावर समोरच आम्हांस श्री साईनाथ महाराजांची एक चांगली मोठी तसबीर दिसली, म्हणून त्याचा शिर्डीशीं कांहीं संबंध आहे काय असें त्यांना विचारले त्यावर आपण १९१३ शिर्डीस गेल्यांची व त्या वेळीं घडलेली हकिगत त्यानीं आम्हास खालीलप्रमाणे सांगितली:—

रा. नाईकांचे शातााराम नावाचे एक स्नेही मदीरापानाच्या व्यसनाधीन झाले होते. तीन दिवसाची रजा घेऊन, एकदां ते साईनाथ महाराजाच्या दर्शनाला गेले असतां महाराजानीं त्याना ६ दिवस ठऊन घेतलें व त्या अवधींत त्याचे मदिरेच व्यसन अजिबात सुटले, ही हकीगत नाईकाना माहीत होती मुबईतील एक श्रीमान् सोनार, (ज्यानीं सोन्याच्या व्यापारात चांगले नांव कमावून अगणित संपत्ति मिळविली आहे.) नाईकांचे स्नेही आहेत त्याचेकडे नाईक एकदा गेले असता, त्याचा एक मुलगा अट्टल दारूबाज बनलेला आहे व दारूतच त्याचा अंत लवकर होणार असे डॉक्टर म्हणतात असे त्याना कळले. त्यावर त्याला एकदा शिर्डीस श्रीबाबांचे दर्शनास न्यावे व त्यामुळे त्याची दारू सुटेल असे नाईकांनीं सागितलें. लगेच मंडळीनीं शिर्डीला जाण्याशी तयारी केली, व नाईक त्या मुलाला घेऊन शिर्डीस जाण्यास निघाले. वाटेत त्याच मद्यपान चालूच होते. मनमाड स्टेशनपासून त्याला वात्या होऊं लागल्या. मंडळी शिर्डीस पोहोचली, तेंव्हा वाती थावली. सर्वजण महाराजांचे दर्शनास गेले. नाईकानीं मनातील आशय कळविला व महाराजांनीं शुभ आशीर्वाद दिला. सर्व मंडळींचा मुक्काम शिर्डीस ४ दिवस होता. त्या अवधींत त्या मुलाने दारू मुळींच मागितली नाहीं. इतकेच नव्हे, परंतु नाईकानीं ‘ घेतोस का ? ’ म्हणून विचारल्यास तो नाहीं म्हणे.

जो गृहस्थ घटकोघटकीं मद्यपान करून सदोदित बेहोष पडलेला असे, त्याचे व्यसन महाराजांचे आशीर्वादाने अजिबात सुटले. मंडळी मुंबईस परत आल्यावर सर्वांना आनंद झाला व ज्या व्यसनापासून एक मृत्यूच त्या मुलाला परावृत्त करील असे सर्वांना वाटत होते, ते व्यसन इतक्या सुलभतन सुटलेले पाहून त्याना महदाश्चर्य वाटले. ही हकीगत वैशाख महिन्यांत घडली. त्या मुलाची प्रकृति चांगली सुधारून तो मनुष्यात आला याप्रमाणे ज्येष्ठ, आषाढ, श्रावण असे तीन महिने गेले भाद्रपदांत घरात गौरी आल्या, कुटुंबांतील कुलाचाराप्रमाणे गौरीपूजन होऊन सर्वांनीं मद्य प्राशन करण्याची परंपरा होती, त्याप्रमाणे ‘ एकच प्याला ’ त्या मुलानेही घ्यावा असा त्याला आग्रह करण्यात आला. परतु त्याने घेण्याचे नाकारिले. त्याचे पुढे ग्लास धरला तेव्हा तो दारूंत मला साईबाबा दिसतात असे सांगू लागला परंत मंडळी ऐकेनात. प्रसाद न घेतल्यास गौरीचा कोप होईल, कुल-संप्रदाया-प्रमाणे घेतलीच पाहिजे असा मडळीनीं दुराग्रह धरल्यावर, त्याने शेवटीं मद्य प्राशन केले. त्याचा परिणाम असा झाला कीं, एखाद्या नररक्ताची चटक लागलेल्या व्याघ्राप्रमाणें, त्यानें पेल्या मागून पेले घेण्यास सुरवात केली. शेवटीं बिछान्यावर निजल्यावर, त्याच्या बिछान्याने पेट घेतला व त्यांत भाजून त्याचा दु:खदायक अंत झाला. बिछाना जळत्या विडीने पेटला असो किंवा अन्य कारणाने पेटला असो, सुटलेली दारू पुन्हा प्यायल्यामुळे तीच त्याच्या नाशाला कारण झाली.